**प्रेसनोट** **दि.१७/०४/२०१९**

## दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## विमानाची तिकीटे परस्पर रद्द करुन ती रक्कम हडप करणाऱ्यास पोलीसांनी केली अटक

इसम नामे सरबजीतसिंग हरजीतसिंग होरा, वय ३४ वर्षे, रा. सी/१०३,दिशा एम्पायर, गंगाव्हिलेज शेजारी, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे व त्याची साथीदार महिला आरोपी यांनी दिनांक १२/१२/२०१८ ते दिनांक २३/०२/२०१९ या कालावधीत इसम नामे संकेत सदाफळे रा.लक्ष्मीनगर, पर्वती, पण याचे मित्रांना मॉरिशिअस ते मुंबईचे विमानाचे तिकिटे इलेक्ट्रॉनीक माध्यमाचा वापर करून काढुन देतो असे सांगून,त्यांना त्यांचे बँक खाते शाखा इंदापुर,बारामती या खात्यावर १,००,०००/- भरावयास सांगीतले. त्याप्रमाणे फिर्यादी इसम संकेत सदाफळे यांनी नेट बँकीग द्ववारे १,००,०००/- रू नमुद खात्यावर भरले असता,आरोपींनी फिर्यादी यांचे मित्रांचे तिकीटे बुक करून, सदर तिकीटे व्हॉटसअॅपवर पाठवली. फिर्यादी यांचे मित्र दिनांक १०/०१/२०१९ रोजी विमानतळावर गेले असता,त्यांची तिकीटे ऐनवेळी रद्द करून,तिकीटाची रक्कम स्वतःचे वरिल खातेवर वळती करून घेवुन सदर रकमेचा अपहार केला असलेबाबत संकेत सदाफळे यांचे फिर्यादी वरून दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे दिनांक २३/०२/२०१९ रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयात आरोपी महिला,वय ३९ वर्षे,रा.माऊलीनगर,कात्रज,पुणे हिस दिनांक २४/०२/२०१९ रोजी अटक करणेत आली असुन,तीचा या गुन्हयातील साथीदार इसम नामे सरबजीत सिंग हरजीतसिंग होरा,वय-३० वर्षे,रा.सी/१०३,दिशा एम्पायर गंगाव्हिलेज शेजारी,हांडेवाडी रोड हडपसर,पुणे यास दिनांक १५/०४/२०१९ रोजी अटक करणेत आली आहे. सदर आरोपीने आणखीन कोणाची फसवणुक केली असल्यास दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

सदरची कारवाई मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,(गुन्हे),राजेंद्र सहाणे, पोलीस उप-निरिक्षक,कुलदिप संकपाळ, सहा.पोलीस फौजदार,घावटे यांनी केली आहे.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे